मंगळवार दिनांक २४ जानेवारी, २०२३ रोजी मध्यवर्ती सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, नाशिक येथे दु.३.३० वाजता मा.जिल्हाधिकारी, नाशिक यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या जिल्हा निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त.

सभेस खालीलप्रमाणे अधिकारी/ सभासद/ उद्योजक उपस्थित होते.
मा.श्री.गंगाथरन डी.,भा.प्र.से., जिल्हाधिकारी, नाशिक.
श्री.संदिप पाटील, महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, नाशिक.
श्री.अमर दुर्गुळे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, नाशिक.
श्री.सतिश चव्हाण, सहाय्यक नगररचनाकार, नगररचना व मुल्यनिर्धारण विभाग, म.शा., नाशिक.
श्री.सोमनाथ पानगव्हाणे, विनता रेझिन क्लस्टर, खडक माळेगांव, ता.निफाड, जि.नाशिक
श्री.प्रविण बाळासाहेब पहिलवान, संचालक, पैठणी क्लस्टर, येवला.
श्री.संजय मारूती विधाते, संचालक, पैठणी क्लस्टर, येवला.
श्री.शांतीलाल भांडगे, संचालक, पैठणी क्लस्टर, येवला.
श्री.दत्तात्रय टी.मुनगीकर, संचालक, पैठणी क्लस्टर, येवला.
श्री.दिगंबर व्ही. भांडगे संचालक, पैठणी क्लस्टर, येवला.
श्री.मुजाहिद अहमद अन्सारी, उपरणे क्लस्टर, येवला.
श्री.मुख्तार अहमद अन्सारी, उपरणे क्लस्टर, येवला.
श्री.संदेश पोखरकर, कार्यकारी संचालक, स्पेसवर्ल्ड इंडिया प्रा. लि

सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र तथा सदस्य-सचिव, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक यांचे परवानगीने सभेच्या कामकाजास सुरूवात केली.

जिल्ह्याचा निर्यात कृती आराखडा विषयी तसेच जिल्ह्यातून निर्यात होत असलेल्या उत्पादनांची माहिती सर्व उपस्थितांना सभेत देण्यात आली. त्यानंतर निर्यात वाढीच्या दृष्टीने काय उपाययोजना करता येत आहेत त्याची माहिती देण्यात आली. निर्यात वाढीसाठी येणा-या मुलभूत अडीअडचणी सोडविण्यासाठी कृती आराखड्यामध्ये समावेश करण्यात आलेला असून राज्य पातळीवर तसेच राष्ट्रीय पातळीवर पाठपुरावा करण्यात येत असल्याचे सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले.

त्यानंतर एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) या संकल्पनेविषयी माहिती देण्यात आली. आपल्या नाशिक जिल्ह्यातून एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) या संकल्पनेंतर्गत दोन उत्पादनांची निवड करण्यात आलेली आहे. त्यात द्राक्ष (Grapes) व इलेक्ट्रीकल कंपोनन्टस् (Electrical Components) या दोन उत्पादनांचा समावेश करण्यात आलेला असल्याचे सदस्य-सचिव यांनी सभेत सांगितले. आपल्या जिल्ह्यात पैठणी उद्योगास चांगला वाव असून इलेक्ट्रीकल कंपोनन्टस् (Electrical Components) ऐवजी पैठणी उद्योगाचा समावेश एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) यामध्ये केल्यास पैठणी उद्योगाचा विकास झपाट्याने होण्यास मदत होईल असे अशी सूचना उपस्थित सभासदांनी सभेत मांडली. त्यावर चर्चा झाल्यानंतर इलेक्ट्रीकल कंपोनन्टस् (Electrical Components) ऐवजी पैठणी उद्योगाचा समावेश एक जिल्हा एक उत्पादन (ODOP) यामध्ये समावेश करण्यात यावा असे सभेत सर्वानुमते ठरले.

तसेच केंद्र शासनाच्या एक रेल्वे स्टेशन एक उत्पादन One Station One Product अंतर्गत जिल्ह्यातील मनमाड व इगतपूरी या रेल्वे स्थानकांवर One Station One Product अंतर्गत द्राक्ष उत्पादनांचा स्टॉल लावण्यात यावा असे सभेत ठरले व त्यासाठी मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक यांचे स्वाक्षरीचे पत्र Divisional Railway Manager (Commercial), Bhusawal Division, Dist.Jalgaon यांना देण्यात यावे असे सभेत ठरले.

येणेप्रमाणे सभेचे कामकाज झाल्यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून मा.अध्यक्षांचे परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

महाव्यवस्थापक, जिउकें
तथा सदस्य-सचिव,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक.

25/1/2023

मा.जिल्हाधिकारी
तथा अध्यक्ष,
जिल्हा निर्यात प्रचालन समिती, नाशिक.